VOL- XI | ISSUE- V | MAY | 2024 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 8.02 | ISSN 2349-638x

# धाराशिव जिल्हयातील पाणलोट क्षेत्राचा विकास रोजगार निर्मिती व आव्हाणे

प्रा. डॉ. कैलास सर्जेराव मोटे
kailasmote1978@gmail.com

**प्रस्तावना :**

नैसर्गिक साधन संपत्तीतील पाणी हा एक महत्वाचा घटक आहे. सर्व सजीव सृष्टी ही पाण्याशिवाय असूच शकत नाही. हवामानातील बदल व वाढते प्रदुषण यामुळे पावसाचे प्रमाण कमी कमी होत चालले आहे, त्यामुळे पाणलोट विकासाकडे विशेषत्वाने लक्षदेण्याची गरज भासू लागली आहे. विविध ठिकाणावरून वाहत वाहत एका विशिष्ट प्रवाहात रूपांतरीत होऊन वाहत जाणारे पाणी अडवणे याला पाणलोट क्षेत्र असे म्हणतात. २१ व्या शतकामध्ये पाण्याची पातळी खालवल्याने पाणी टंचाईचे संकट कोसळले आहे. खालावलेली पाणी पातळी कमी करण्याच्यादृष्टीने पाणलोट क्षेत्राचा विकास करणे ही काळाची गरज आहे.

पाणलोट कार्यक्रमाचा इतिहास पाहिला तर असे लक्षात येते की, सन १९४२ मध्ये जमिन सुधारणा कायदा अस्तित्वात आला. तो मुख्यत्वे मृदा संधारणावरच भर देणारा होता. परंतु अनिश्चित पावसामुळे वारंवार येणा-या अवर्षणाची परिस्थिती आणि दुष्काळाचे चक्र चालूच असल्यामुळे जमिनीची धूप थांबविण्याबरोबरच भूगर्भात जास्तीत जास्त पाणी मुरविणे या बाबीलाही तितकेच महत्त्व प्राप्त झाले. १९८२-८३ पासून पाणलोट पाडून त्यातील संपूर्ण क्षेत्रावर जमिनीच्या उपयोगीतेनुसार मृदा आणि जल संधारणाची विविध कामे करण्यास सुरूवात झाली. महाराष्ट्र शासनाने भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने राज्यात असे सुमारे १४८१ पाणलोट पाडलेले आहेत. केंद्र शासनाने सुरू केलेल्या अवर्षण प्रवणक्षेत्र कार्यक्रम, एकात्मिक पडीक जमीन विकास, राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम, नदी खोरे प्रकल्प, पश्चिम घाट विकास कार्यक्रम, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम इत्यादी योजना देखील राज्य शासनाने पुढाकार घेवून राबविण्याचा प्रयत्न केला. यात स्वयंसेवी संस्थांचे ही योगदान मोलाचे आहे.

राज्यातील पर्जन्यमान हे अनिश्चित व खंडीत स्वरूपाचे असल्यामुळे त्याचा थेट परिणाम पिकांच्या उत्पादकतेवर होतो. त्यामुळे राज्यात पाणलोट विकास क्षेत्राच्या कार्यक्रमास अनन्य साधारण महत्त्व आहे. पाणलोट विकास कार्यक्रमाच्या अनेक योजना शासनाने हाती घेतल्या आहेत.

राज्याच्या सिंचन क्षमतेचा विचार करता राज्यातील बहुतांश शेती पर्जन्याधारित आहे. या शेतीसाठी संरक्षित जल सिंचनाची साधने निर्माण करणे, जमिनीची प्रचंड प्रमाणात होणारी धूप थांबविणे तसेच पडीक जमिनीचा विकास करून ग्रामीण भागातील उत्पन्नाची व उत्पानाची साधने वाढविणे यासाठी जलसंधारणाचा कार्यक्रम राज्यात अनेक योजनाव्दारे राबविण्यात येत आहे. सन १९८३ पर्यंत या कार्यक्रमाकडे केवळ मृद संधारणाचा कार्यक्रम म्हणून पाहिले जात होते. तसेच या कामासाठी खर्च होणा-या निधीची वसूली देखील शेतक-यांकडून करण्यात येत होती. त्यामुळे या कार्यक्रमाची व्याप्ती अत्यंतसिमीत राहिली. परंतु या कार्यक्रमाचे महत्त्व लक्षात घेवून हा संपूर्ण कार्यक्रम पूर्णतः शासकीय खर्चाने राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतल्यानंतर या कार्यक्रमास चालना मिळाली. सन १९८३ नंतर मृद व जलसंधारणाच्या बाबी पाणलोट आधारीत करण्याचा निर्णय शासनाने घेतल्यामुळे या कार्यक्रमास तांत्रिक स्वरूप प्राप्त झाले. पाणलोट कार्यक्रमात वेळोवेळी विविध विभागांचा आणि गरजेनुरूप नवनविन उपचारांचा समावेश करून या कार्यक्रमाची परिणामकारकता वाढविण्याचे प्रयत्न करण्यात आले. राज्य शासनाप्रमाणेच केंद्र शासनाने सुरू केलेले अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम एकात्मिक पडीक जमीन विकास राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम, नदी खोरे प्रकल्प, पश्चिम घाट विकास कार्यक्रम, एकात्मिक पाणलोट व्यस्थापन कार्यक्रम इ. योजना देखील शासनाने पुढाकार घेवून राबविण्याचा प्रयत्न केला. पाणलोट कार्यक्रम राबविण्यासाठी शासनाच्या विविध विभागाप्रमाणेच स्वयंसेवी संस्थांनाही या कार्यक्रमात सहभागी करून हा कार्यक्रम लोकाभिमुख करण्याचे प्रयत्न वेळोवेही करण्यात आले. सन १९९२ मध्ये या कार्यक्रमाच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने स्वतंत्र जलसंधारण विभागाची निर्मिती केली. तसेच कृषि, समाजिक वनीकरण, लघुपाटबंधारे आणि जलसंर्व्हेक्षण व विकास यंत्रणा या चार विभागांचा समावेश जलसंधारण विभागात करून तो अधिक सक्षम केला.

२०१६ मध्ये अमिर खान व त्याच्या पत्नी किरण राव यांनी पाणी फांउडेशनची स्थापना करून मराठवाडयातील अवर्षण ग्रस्त भागामध्ये मोठया प्रमाणावर पाणलोट क्षेत्राची कामे केली. यामुळे कार्य केलेल्या क्षेत्रातील पाणी पातळीमध्ये मोठया प्रमाणावर वाढ झाली, यामुळे येथील गावांचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यास मोठया प्रमाणावर मदत झाली.

२०१५ मध्ये दुष्काळ व टंचाई निवारणार्थ महाराष्ट्र शासनाने जलयुक्त शिवार अभियान राबविण्यास सुरूवात केली त्यामध्ये धाराशिव जिल्हयाचा समावेश होता. यामुळे जिल्हयातील पाणीपातळीमध्ये मोठया प्रमाणावर वाढ झाली आहे. जलयुक्त शिवारामुळे विहिरीच्या पाणीसाठयामध्ये जवळ पास तीन मीटरने वाढ झाली. या अभियाना अंतर्गत २०१५-१६ मध्ये जिल्हयातील २१७ गावांची निवड करण्यात आली होती. या अभियानाअंतर्गत २१०२५ कामे हाती घेण्यात आली होती. या कामावर जवळपास ८६.५४ कोटी रूपये खर्च करण्यात आले होते. या कामामध्ये लोकसहभाग ही घेण्यात आला होता. २०१६-१७ मध्ये जिल्हयातील १९१ गावांची निवड करण्यात आली होती यामध्ये १६७९५ कामे प्रस्तावित करण्यात आली होती. यातील ९८०० कामे पूर्ण करण्यात आली होती. या कामावर जवळपास ७४.५६ कोटी रूपये खर्च करण्यात आले होते. २०१७-१८ मध्ये या अभियानांतर्गत १७८ गावांची निवड करण्यात आली होती यामध्ये १०५७९ कामे प्रस्तावित होती. या अभियानांतर्गत कंपार्टमेंट बंडिंग, मातीनाला, बांध, नाला सरळीकरण व खोलीकरण, सिमेंट नाला, नदी नाले पाझर तलाव व ओढयामधील गाळ काढणे, विहीर पुनर्भरण, बोअर पुनर्भरण, शेततळी आदी कामांचा समावेश करण्यात आला होता. मागेल त्याला शेततळे योजनेंतर्गत जिल्हयासाठी ३७०० शेततळयांचे उद्दिष्ट देण्यात आले होते त्यापैकी २२२४ शेततळी पूर्ण झाली आहेत. तर उर्वरीत शेततळयांची कामे प्रगती पथावर होती.

धाराशिव जिल्हाचा विचार करता धाराशिव जिल्हा हा अवर्षणग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्हयात पडणाऱ्या पावसाचे प्रमाण हे अत्याल्प आहे. इतकेच काय तर दर दोन वर्षांनी या जिल्हयाला दुष्काळाचा सामना करावा लागतो. जिल्हयाला भौगोलिक वारसा ज्या पध्दतीने लाभणे आवश्यक होते, त्या पध्दतीने लाभलेला नाही. जिल्हयातून मोठी नदी वाहत नसून येथील नदया हंगामी स्वरूपाच्या वाहनाऱ्या छोटया स्वरूपाच्या कमी लांबीच्या आहेत. बहुतांश नदया पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहत जाणा-या आहेत. जिल्हयामध्ये पाणलोट क्षेत्राचा ज्या पध्दतीने विकास होणे आवश्यक होते त्या पध्दतीने झालेला नाही. पाणलोट क्षेत्राच्या विकासासाठी जिल्हयामध्ये जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात आले परंतु कामाचा दर्जा ज्या पध्दतीने आवश्यक होता त्या पध्दतीने राहिला नाही कारण ज्या वर्षी हे काम झाले त्या वर्षापूरताच त्या कामाचा उपयोग झाला नंतरच्या पुढील वर्षात या केलेल्या कामाचा उपयोग होऊ शकला नाही. कारण नंतर ती कामे होतीची नव्हती झाली. दर्जेदार कामे न झाल्याने पाण्याचा प्रश्न आजही अनुत्तरीत आहे. जिल्हयातील पाणलोटचा प्रश्न सोडवायचा असेल तर कायमस्वरूपी टिकावू स्वरूपाच्या दर्जेदार कामाची उभारणी करणे गरजेचे आहे. तरच जिल्हयाची दुष्काळ, पाणी टंचाई व विकासाच्या प्रश्नापासून मुक्तता होऊ शकेल.

**जिल्हयाच्या दृष्टीने पाणलोटचे महत्त्व :**

अत्यंतसिमीत सिंचन क्षमता असलेल्या महाराष्ट्राकरिता मृद व जलसंधारणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. पूर्ण सिंचनक्षमता विकसीत केल्यावरही राज्यातील जवळपास ७० टक्के क्षेत्र कोरडवाहूच राहणार असल्यामुळे ग्रामिण भागातील अर्थव्यवस्था बळकट करून जनतेचे जीवनमान उंचावण्याकरिता कोरडवाहू शेतीचा अग्रक्रमाने विकास करणे अपरिहार्य झाले आहे. याच कारणास्तव पाणलोट विकास कार्यक्रमास प्राधान्य देणे गरजेचे आहे. राज्यामध्ये अवर्षण प्रवण क्षेत्राची व्याप्ती जवळपास ५२ टक्के असून हलक्या जमिनीचे प्रमाण ३९ टक्के आहे. धाराशिव जिल्हयाचा विचार करता जिल्हयातील बहुतांश म्हणजे ९० टक्के पेक्षा अधिक क्षेत्र हे पावसाच्या पाण्यावर अवलंबून असून पडणाऱ्या पावसाचे प्रमाणही अत्याल्प आहे. त्यामुळे जिल्हयातील पाणलोट क्षेत्र विकासाला चालना देणे गरजेचे आहे. वाहून जाणारे पाणी एकत्र करून तसेच पावसाचे पाणी जमिनीतच मुरवल्यास व पाणलोट क्षेत्र विकासाला गती मिळाल्यास जिल्हयाच्या विकासालाही गती मिळणार आहे. जिल्हयामध्ये ६ ते ७ लघु व मध्यम प्रकल्प आहेत. सध्या या प्रकल्पात गाळाचे प्रमाण अधिक असल्याने पाण्याचासाठा राहू शकत नाही. कोल्हापूरी बंधारे मोठया प्रमाणावर होते परंतु देखरेखी अभावी ते आज नामशेष झाली आहेत. जिल्हयाची परिस्थिती लक्षात घेता पाणलोट क्षेत्राचा विकास झाल्यास उत्पादनक्षेत्रात वाढ होऊन रोजगार निर्मितीस मदत होणार आहे. इतकेच नाही तर अर्थकारण व समाजकारणा बरोबरच लोकांचे जीवनमान उंचावण्यासही मदत मिळणार आहे.

**अ. पाणलोट संदर्भात केंद्र पुरस्कृत योजना :**

एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम, पश्चिम घाट विकास कार्यक्रम, राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम, नदी खोरे प्रकल्प

**ब. राष्ट्रीय कृषिविकास योजना :**

विदर्भ सधन सिंचन विकास योजना, महात्मा फुले जल भूमी संधारण अभियान, साखळी पध्दतीने चेक डॅम बांधण्याचा कार्यक्रम

**क. राज्य पुरस्कृत योजना :**

जलयुक्त शिवार योजना, पाणी आडवा पाणी जिरवा योजना, नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी व्दारे पाणलोट विकास कार्यक्रम,गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम, आदर्श गाव योजना, टंचाईग्रस्त जिल्हयात साखळी पध्दतीने सिमेंट नाला बांध योजना, आदर्श गाव योजना, एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम, पाणलोट विकास चळवळ, पडकई विकास कार्यक्रम – अदिवासी क्षेत्राकरीता मृद व जलसंधारण विभागामार्फत पाणलोट आधारित क्षेत्र नाला उपचारांची कामे हाती घेतली जातात.

**कोरडवाहू शेतीचा शाश्वत विकास पाणलोट विकासामुळेच :**

पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमापूर्वी मृदसंधारणाची कामे एकेरी पध्दतीवर, विखूरलेल्या स्वरूपात व ज्या ठिकाणी शेतकऱ्यांची संमती मिळत होती त्याच ठिकाणी केली जात होती. त्यामुळे या कामाचा फायदा ठराविक क्षेत्रापुरताच मर्यादीत होता. पाणलोट क्षेत्र निवडल्यामुळे त्या जमिनीच्या क्षमतेनुसार विविध उपचार केले जातात व जमिनीचे योग्य प्रकारे संवर्धन होते. तसेच पाणलोट क्षेत्रात किती पाऊस पडतो त्यातून किती पाणी उपलब्ध होणार आहे. किती पाणी विविध ठिकाणी अडविले जाणार आहे. किती पाणी बाहेर वाहून जाणार आहे याचा हिशोब करून नियोजन करता येते. त्यामुळे जास्तीत जास्त पाणी जमिनीमध्ये अडविण्यासाठी/जिरविण्यासाठी त्या क्षेत्रावर निरनिराळे उपचार घेता येतात. पाणलोट क्षेत्रातील सर्व जमिनीवर उतारानुसार तसेच पाणी साठविण्याची क्षमता यांचा विचार करून कामे केली जातात.

पाणलोट क्षेत्र निवडल्यामुळे मृदसंधारण व जलसंधारणाची सर्व कामे या क्षेत्रावर केली जातात. ही सर्व कामे एकमेकांना पुरक असल्यामुळे त्यांचा एकत्रित परिणाम निश्चितच चांगला दिसून येतो.

पाणलोट क्षेत्रात वरच्या भागात विविध उपचारांची कामे केल्यामुळे धूपीचे प्रमाण कमी होते. वाहून जाणा-या पाण्याचा वेग नियंत्रित होतो, खालच्या भागात भूजलाचे पुनर्भरण होते व भुजलाची पातळी वाढते. तसेच नत्र, स्पुरद व पालाश इ. अन्नद्रव्याचा ऱ्हास देखील थांबतो. पाणलोट क्षेत्रामुळे संपूर्ण क्षेत्राचा विकास साधता येतो, सर्व क्षेत्र उत्पादनक्षम होऊन उत्पादनात वाढ होते व आर्थिक विकास साधता येतो.

पाणलोट क्षेत्रामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होते.

नैसर्गिक साधन संपत्तीचा पुरेपूर फायदा घेता येतो. पाणलोटक्षेत्रामुळे मोठया प्रमाणाात रोजगार उपलब्ध होतो. पिकास उपयुक्त अन्नद्रव्य नत्र, स्पुरद व पालाश यांची हानी कमी होते. हा कार्यक्रम आरोग्याच्या दृष्टीनेही महत्वाचा आहे. आदिवाशी क्षेत्रातील जमिनीची उत्पादकता वाढविण्यासाठी योग्य ते उपचार राबविल्यास उत्पादकता वाढून कुपोषणाच्या प्रश्नाची तीव्रता काही प्रमाणात कमी होऊ शकते.

**पाणलोट विकासाची तत्वे :**

राज्यातील व जिल्हयातील पाणलोट विकासात खालील प्रमाणे विविध तत्वांचा अवलंब करण्यात येत आहे.

पाणलोट क्षेत्रात समाविष्ट असलेली खाजगी, पडिक, सामुदायिक आणि वनजमिन या नैसर्गिक साधन संपत्तीचा जमिन उपयोगितेनुसार वापर करण्यावर भर देण्यात येतो. वृक्ष लागवडीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहीत करणे तसेच पाणलोट क्षेत्रातील विविध विकासाची कामे ही माथा ते पायथा या तत्वावर केली जातात. पाणलोटातील उपलब्ध पाण्याचे भुगर्भात पुनर्भरण करण्यावर भर देणे. मुलस्थानी ओल टिकवणे किंवा ओलावा साठवणूक तंत्रज्ञानाचा वापर करणे. पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी ठिबक व तुषार सिंचनाचा मोठया प्रमाणावर वापर करण्याबाबत शेतकऱ्यांना प्रशिक्षण, प्रात्यक्षिके, अनुदान इ. माध्यमातून प्रवृत्त करणे. भुगर्भातील पाण्याचा अतिउपसा टाळण्याकरिता करण्यात आलेल्या कायदयाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता जनजागृती करणे. कोरडवाहू शेतीची उत्पादकता वाढवून कृषि उत्पादनात स्थैर्य आणणे. बोरवेल घेतांना तो किती खोली पर्यत योग्य आहे त्याची नियमावली ठरवणे. भूमीहीन कुटुंबाना उपजीवीकेचे साधन उपलब्ध करून देणे.

प्रकल्प नियोजनाचा, निर्णयाच्या व अंमलबजावणीच्या प्रक्रियेत अधिकाराचे लोकशाही तत्वावर पुर्णतः विकेंद्रीकरण करता येते. ग्राम पातळीवर समुहांना छोटया छोटया गटामध्ये संघटीत करून त्यांना क्रियाशील करणे. कमी साधन सामुग्री असणाऱ्या कुटुंबांना आणि महिलांसाठी आर्थिक समानता निर्माण करणे.

**शेतीच्या शाश्वत विकासासाठी उपाय :**

जागतिक बॅंकेने ६८ टक्के अवर्षण क्षेत्रातील महत्वाची आव्हाने अधोरेखित केली आहेत. त्यात भारताच्या सर्वांगीण विकास व ग्रामीण भागातील गरीब लोकसंख्येच्या कल्याणाकरता शेतीची उत्पादकता वाढविण्यासोबत रोजगाराची स्थानिक

पातळीवरच उपलब्धता याकडे प्राधान्याने लक्ष वेधले आहे. गावातील शेती क्षेत्राची कृषि उत्पादकता वाढविणे उत्पादकता वाढीसाठी शाश्वत सिंचनाची व्यवस्था आवश्यक आहे. सध्या शेती सिंचनासाठी उपलब्ध जलसंसाधने मर्यादित आहेत. त्यावर वाढते औद्योगिकीकरण व शहरीकरण यांचा ताण वाढत आहे. शेती क्षेत्राची उत्पादकता वाढविणे, आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आहे. पिकांची निवड करणे शेतीमालावरील प्रक्रिया करून स्पर्धात्मक बाजारामध्ये आपली उत्पादने नेणे यासारख्या उपाययोजनांवर भर दिला पाहिजे.


सर्वसमावेशक सामाजिक धोरणाव्दारे ग्रामीण भागातील गरिबीचे निर्मूलनावर भर, गरीब मालमत्ता नसणारे महिला अनुसूचित जाती जमाती आदिवासी समुदाय यांच्यासाठी कृषि व कृषि क्षेत्रातून रोजगार निर्मिती करणे गरजेचे आहे. जागतिक बॅंकेच्या म्हणण्यानुसार भारतामध्ये अवर्षण प्रवण क्षेत्र आणि पूर्वेकडील गंगा नदी प्रदेशामध्ये गरिबीचे सावट मोठया प्रमाणावर आहे. या विधानाचा विचार करता धाराशिव जिल्हा हा सर्वाधिक अवर्षण प्रवण क्षेत्र असणारा जिल्हा आहे. ही परिस्थीती असूनही लोकांमध्ये पाणलोट व पाणी बचतीबाबत साक्षरता नाही.

कृषि क्षेत्रातील उत्पादन वाढ अन्नसुरक्षेला बळ देते १९७० नंतर भारतातील हरितक्रांतीच्या माध्यमातून वाढलेले कृषि उत्पादन हे दुष्काळाची दाहकता कमी करण्यामध्ये यशस्वी ठरले. तसेच १९७० ते १९८० या दरम्यान ग्रामीण भागातील रोजगार वाढले. अन्नधान्याच्या किंमती मर्यादित राहिल्या व गरिबीचे सावट देखील कमी झाले. मात्र कृषि क्षेत्राची वाढ १९९० ते २००० च्या दरम्यान ३.५ टक्के प्रतिवर्षी या दराने रोडवली असल्याचे जागतिक बॅंकेने आपल्या अहवालात म्हटले आहे.

२००० ते २०१० या काळात कृषि उत्पादनात वाढ झाली मात्र ज्या प्रमाणात कृषि विकासाला गती मिळणे आवश्यक होते मात्र त्या प्रमाणात मिळालेली नाही. दुष्काळ व अतीवृष्टी यामुळे कृषि विकासाला खिळ बसली, इतकेच नाही तर कृषि मालाच्या किंमती कमी झाल्याने शेतकऱ्यांना याचा तोटा सहन करावा लागला.

कारोना विषाणू संसर्गाच्या पहिल्या आणि दुसऱ्या लाटेत भारत आणि जगातील इतर अर्थव्यवस्थावर मोठा परिणाम झाला आहे. कोरोना संसर्गामुळे जवळपास सर्व क्षेत्र प्रभावित झाली आहेत. मात्र कोरोनाच्या संकटकाळात भारतीय अर्थव्यवस्थेला सांभाळण्याचे काम शेती क्षेत्रानं केलं आहे. देशातील शेतकऱ्यांनी अर्थव्यवस्था सांभाळून ठेवली आहे. कोरोना महामारीच्या दुसऱ्या लाटेचा शेती क्षेत्रावर कमी परिणाम जाणवेल, असं निती आयोगावरील शेती क्षेत्राचे प्रतिनिधी यांनी भारतीय शेतीच्या विकास दराबद्दल बोलताना सांगितले की २०२१-२२ या आर्थिक वर्षात शेतीचा विकासदर तीन टक्के पेक्षा अधिक राहिला आहे .

अन्न धान्याच्या उत्पादनाचा विचार करता २०१७—१८ ते २०२०-२१ या कालखंडामध्ये अन्नधान्याच्या उत्पादनामध्ये सातत्याने वाढ होत गेली आहे. कृषि क्षेत्राचा विकास दर २०२०- २१ मध्ये ३.६ टक्के होता तर २०२१-२२ मध्ये हा विकास दर ३.९ टक्के होता. कोरोना काळात ही कृषि क्षेत्राचा विकासदर कायम राहिला आहे. राज्याचा गेल्या वर्षी कृषि विकासदर केवळ ४.४ टक्के होता. अर्थात २०२१-२२ मध्ये कृषि विकासदर ४.४ टक्के होता. २०२२-२३ मध्ये वाढ होऊन तो १०.२ टक्के झाला होता. तुलनेत देशाच्या एकूण अर्थव्यवस्थेचा विचार करता १९९०—९१ मध्ये शेती विकासाचा दर ३५ टक्के होता हाच दर २०२२-२३ मध्ये घसरून १५ टक्केवर आला आहे.




**धाराशिव जिल्ह्यातील पाणलोट क्षेत्राचा विकास व रोजगार निर्मिती :**

शेती क्षेत्राला पुरक व आवश्यक असणारे क्षेत्र म्हणजे पाणलोट क्षेत्र; पाणलोट क्षेत्राचा विकास झाल्याशिवाय शेती क्षेत्राचा विकास होणे शक्य नाही. त्यामुळे पाणलोट क्षेत्राचा विकास होणे आवश्यक आहे. पाणलोट व्यवस्थापन, प्रकल्प हे रोजगार निर्मितीचे स्त्रोत आहे. पाणलोट प्रकल्पांतर्गत राबवले जाणारे उपक्रम मृदा संवर्धन, वृक्ष लागवड, वनीकरण, फळबाग लागवड आणि इतर संबंधित कामे यांचा समावेश असतो. या

प्रकल्पाच्या उपचारासाठी मोठया प्रमाणावर मनुष्यबळाची आवश्यकता असते. यातून मोठया प्रमाणावर रोजगार निर्मिती होण्यास मदत होणार आहे. पाणलोट व्यवस्थापनाचे प्रकल्प पूर्ण झाल्यावर शेती व औद्योगिकीकरण तसेच इतर पूरक व्यवसायाला मोठया प्रमाणावर चालणा मिळणार आहे. यातून रोजगार निर्माण होण्यास मदत मिळणार आहे. पाणलोट क्षेत्राच्या विकासातून अल्पभूदारक व माळरानाला चांगले दिवस येतील तसेच भूमिहीनांना ही नियमित रोजगार उपलब्ध होणार आहेत. एखादा पाणलोट प्रकल्पाची उभारणी झाल्यावर किती रोजगार निर्मिती होऊ शकते याचा अंदाज बांधला जाऊ शकतो. याला रोजगार निर्मिती गुणोत्तर असे म्हणता येईल.

महाराष्ट्र राज्याच्या पाणलोट क्षेत्राच्या विकासाचा विचार करता राज्यात ६ भौगोलीक विभाग आहेत त्या विभागातील पश्चिम महाराष्ट्र हा विभाग पूर्वी सर्वात जास्त दुष्काळी भाग म्हणून गणला जात होता. मात्र या विभागामध्ये मोठया प्रमाणावर पाणलोट विकासाची कामे झाल्याने तसेच जलसिंचनाची कामे मोठया प्रमाणावर झाल्याने येथील लोकांच्या जीवनमानात मोठया प्रमाणावर बदल झालेला आहे. या विभागामध्ये मोठया प्रमाणावर रोजगार निर्मिती झाली आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत इतर विभागामध्ये ज्या प्रमाणात पाणलोट क्षेत्राचा विकास होणे अपेक्षित आहे त्या प्रमाणात झालेला नाही. त्यामुळे रोजगारामध्ये वाढ झालेली दिसून येत नाही. पर्यायाने येथील लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध नसल्याने जिल्हयातील लोकांचे रोजगारासाठी जिल्हयाबाहेर स्थलांतर मोठया प्रमाणावर होत आहे. जिल्हयात रोजगाराची कमतरता असल्याने येथील लोकांच्या जीवनमानामध्ये विशेष असा बदल झालेला दिसून येत नाही.

पाणलोट क्षेत्राचा विकास झाल्यास शेती क्षेत्राचा मोठया प्रमाणावर विकास होणार आहे. पडजमिन व कोरडवाहू जमिनीला बारमाही पाणी मिळाल्यास लोकांच्या हाताला काम मिळण्यास मदत होणार आहे. यातून रोजगाराच्या संधीतमोठया प्रमाणावर वाढ होणार आहे. उदा. फळबाग, भाजीपाला, ऊस लागवड, वृक्ष लागवडीचे क्षेत्र वाढणार आहे. तसेच मत्स व्यावसाय, पशुपालन व दुग्धव्यावसायाला मोठया प्रमाणात चालना मिळणार आहे. इतकेच नाही तर वाहतूक, प्रक्रीया उद्योग व इतर पुरक उद्योग उभारनीस मदत होणार आहे. यामुळे रोजगाराच्या संधीमध्ये वाढ होणार आहे. जिल्हयाच्या एकूण ७० टक्के पेक्षा अधिक हेक्टर वरील जमिनीस याचा फायदा होणार आहे.

एकंदर ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनमानात बदल घडवून आणण्यासाठी पाणलोट क्षेत्राचा विकास होणे गरजेचे आहे.

**धाराशिव जिल्हयातील पाणलोट क्षेत्र विकासापुढील आव्हाणे :**

पर्जन्याश्रयी शेतीचे अधिक शाश्वत व उत्पादनक्षम शेतीत रूपांतर करणे, सिंचन क्षेतात वाढ करण्याच्यादृष्टीने विशेष प्रयत्न करणे, शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना सर्वतोपरी पाठिंबा देऊन त्यांना सक्षम करणे. ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न सोडविणे, ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करून गावातच रोजगाराची पुरेशी निर्मिती करणे, मोठया, मध्यम तसेच लघुसिंचन प्रकल्पांच्या पाणवहाळ क्षेत्रातील धुपीचे प्रमाण कमी करून जलाशयांचे आयुष्यमान वाढविणे.

नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन करून पर्यावरणाचा समतोल राखणे, भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविणे, पडिक व अवनत जमिनी उत्पादनक्षम करणे, वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पुरविण्याकरीता व ग्रामीण भागात संपन्नता आणण्याकरीता कृषि उत्पादनात वाढ करून सातत्य राखणे, जिल्हयातील पड जमिन व उताराच्या जमिनीवर पाणलोटची कामे करणे यामुळे पडणारा पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत मुरण्यास मदत होईल, जिल्हयामध्ये वनसंवर्धनाचे क्षेत्र खूप कमी आहे त्यादृष्टीने वृक्ष लागवडीवर विशेष भर देणे. पाणलोट विकासाचे क्षेत्र निश्चित करून त्याचा आराखडा तयार करून त्यासाठी लागणार आर्थिक निधी उपलब्ध करणे., दर्जेदार विकास कामांना विशेष प्राधान्य देणे.पाणी अडविणे/जिरविणे बाबत लोकांचा सहभाग वाढविणे. पाणी साठवण क्षमता निर्माण करणारी नविन कामे हाती घेणे. जुने कोल्हापूरी बंदारे, लघु व मध्यम प्रकल्पांची निगा व संवर्धन करणे, अस्तित्वात असलेल्या जलस्त्रोतातील गाळ लोकसंहभागातून काढणे. भविष्यातील दुष्काळ व पाणी टंचाई लक्षात घेता पाणी बचतीला प्राधान्य देणे.

वरील बाबींचा विचार केला तरच धाराशिव जिल्हयाच्या विकासाला गती मिळण्यास मदत होईल. जिल्हयातील लोकांना जिल्हयातच रोजगार कसा उपलब्ध करून देता येईल यादृष्टीने मोठया प्रमाणावर प्रयत्न होणे गरजेचे आहे. अन्यता जिल्हयातील लोकांचे रोजगार व शिक्षणासाठी जिल्हयाबाहेर जे स्थलांतर होत आहे ते रोखने कठीण होणार आहे.

**संदर्भ ग्रंथसूची :**

१. मागेल त्याला शेततळे क्रमांक.शेततळे -२०१६/प्र.क्र.१७/रोहयो-५ १० आक्टोबर २०१६, मागेल त्याला शेततळे योजना राज्यात लागू करणे.
२. मार्गदर्शक पुस्तीका, कृषि व जलसंधारण विभाग, जलयुक्त शिवार अभियान सन २०१७–२०१८, जिविसाबपा संस्था, उस्मानाबाद
३. https:// agrowon.esakal.com, पाणलोट क्षेत्र विकासातील लोकसंहभागाचा निर्देशांक.
४. https:// swcd.maharashtra.gov.in, पाणलोट क्षेत्र व्यवस्थापनाच्या विविध योजना, मृद व जलसंधारण विभाग महाराष्ट्र शासन